## न्यूज ब्रिफ

**घरातच संपविले तरुणाने आयुष्य !**

**जळगाव : प्रतिनिधी**

घरी कोणीही नसताना मुकेश अर्जुन पाटील (३५, रा. चंदूअण्णा नगर) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना २६ मार्च रोजी, दुपारी उघडकीस आली. याप्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. संगणक केंद्राचा व्यवसाय करणारे मुकेश पाटील हे बुधवारी (२६ मार्च) दुपारी घरी एकटेच होते. त्यावेळी त्यांनी गळफास घेतला. कुटुंबीय घरी आले तेव्हा ही घटना उघडकीस आली. मुकेश यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात डॉक्टरांनी मयत घोषित केले. आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नसले तरी गेल्या काही दिवसांपासून मुकेश हे आर्थिक विवंचनेत होते.

**सुकी नदी पात्रात तरुणाचा आढळून आला मृतदेह !**

**रावेर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाल येथील सुकी नदी पात्रात मध्य प्रदेशातील मूळ रहिवासी असलेल्या तरुणाचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पाल येथील वन प्रशिक्षण केंद्राच्या खाली सुकी नदी पात्रात पाल गावाकडे जाणाऱ्या कच्चा रोडच्या बाजूला सुरेश सुमया बारेला (वय २५) या तरुणाचा मृतदेह आढळून आला. हा तरुण मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातील कसोटी येथील मूळ रहिवासी आहे.

### कृषी विद्यालयाच्या समोर बसने दिली धडक !

# भरधाव बसच्या धडकेत दुचाकीस्वार ठार !

जळगाव : प्रतिनिधी

भरधाव बसच्या धडकेत दुचाकीस्वार अशोक यशवंत सपकाळे (वय ६२) हे गंभीर जखमी झाले. त्यांना तात्काळ किनगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरु असतांना बुधवारी दुपारच्या सुमारास मृत्यू झाला. याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे कि, यावल तालुक्यातील किनगाव गावाजवळ यावल कडून येत असलेल्या (एमएच १४ बी.टी. २१४४) क्रमांकाची बस घेवून चालक विदगाव मार्गे जळगावकडे जात होते. यावेळी कृषी विद्यालयाच्या समोर एस.टी. बसने (एमएच १९, एटी ८५८८) क्रमांकाच्या मोटारसायकलवरुन जात असलेल्या अशोक यशवंत सपकाळे यांना धडक दिली. या अपघातात सपकाळे यांच्या डोक्याला, पायाला गंभीर दुखापत होवून ते जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच बाजार समितीचे उपसभापती बबलू कोळी, सचिन तडवी, गुड्डू पिंजारी यांनी जखमी सपकाळे यांना तात्काळ किनगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ. दर्शना निकम, मोहीनी धांडे, भाग्यश्री भारंबे, सरदार कनाशा यांच्या पथकाने उपचार केले.



अपघातात जखमी झालेल्या अशोक सपकाळे यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल केले. याठिकाणी त्यांच्यावर उपचार सुरु असतांना त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मयत अशोक सपकाळे हे जेडीसीसी बँकचे सेवानिवृत्त कर्मचारी होते.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा तीन मुली असा परिवार आहे.

अपघाताची माहिती मिळताच यावल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर, पोहेकॉ सुनिल पाटील हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अपघातग्रस्त एसटी बस आणि दुचाकी पोलीस ठाण्यात आणली. याप्रकरणी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास उपनिरीक्षक पाराजी वाघमोडे, हवालदार संदीप सूर्यवंशी, किशोर परदेशी करीत आहे.

## जळगाव जिल्ह्यात 340 कोटींचे कर्जवाटप

जळगाव : प्रतिनिधी

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एकूण 30000 स्वयंसहाय्यता समूह आहेत या स्वयंसहाय्यता समूहांमध्ये तीन लक्ष एवढ्या महिला आहेत जळगाव जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत जळगाव जिल्ह्यासाठी असलेल्या उद्दिष्टपैकी यावर्षी 340 कोटी रुपये 13000 स्वयंसहायता समूहांना कर्ज स्वरूपात दिलेले आहे दिनांक 26 27 व 28 मार्च रोजी माननीय जिल्हाधिकारी महोदय यांनी महिला बचत गटांसाठी विशेष कॅम्प स्वरूपात कर्जवाटप पीएमईजीपी योजना संदर्भात तथा पी एम एफ एम ई योजना संदर्भात विशेष कॅम्प बँक स्तरावर आयोजित करण्याचे सूचित केले आहे.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सूचित केल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव जिल्ह्यातील जवळपास 220 शाखांमध्ये कर्ज वाटप कॅम्प सुरू करण्यात आलेला आहे सदरील कॅम्प साठी जिल्ह्यातील उमेद अभियानातील केडर तसेच तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील कर्मचारी यांच्या मदतीने तीन दिवसीय कॅम्पमध्ये प्रथम दिवसात 20 (पान २ वर)

## डॉक्टर होण्याचे स्वप्न, पालकांची साडेसात लाखात फसवणूक !

जामनेर : प्रतिनिधी

मुलगा डॉक्टर व्हावा, यासाठी धडपडणाऱ्या डॉक्टर पालकाचीच साडेसात लाखांत फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी फत्तेपूर (ता. जामनेर) पोलिसांत महिलेसह तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हे जामनेर तालुक्यात डॉक्टर आहेत. मुलगा डॉक्टर व्हावा या अपेक्षेने त्यांनी त्यांच्या अंबरनाथ येथील मित्राशी संपर्क साधला. या मित्राने त्यांना महेश शांताराम वाघमारे (नवी मुंबई) व राहुल शर्मा (रा. गाझियाबाद) यांचे संपर्क क्रमांक दिले. त्यांच्याशी संपर्क केल्यावर वाघमारे याने १४ नोव्हेंबर २०२१ रोजी नवी मुंबईतील कार्यालयात बोलावून शैक्षणिक कागदपत्रे, पासपोर्ट यासाठी २ लाख रोख घेतले. कोणतीही पावती न देता इन्व्हीटेशन पत्र दिले. या पत्रासाठी ४ डिसेंबरला २० हजार,व्हिसा मिळविण्यासाठी ६० हजार दिले. त्यानंतर बायोमेट्रिक थंबसाठी (पान २ वर)

## झांबरे विद्यालयात विद्यार्थ्यांनी केले पी.पी.टी प्रेझेंटेशन

जळगाव : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात समग्र शिक्षा उपक्रमाचे अंतर्गत प्रत्येक शाळेत संगणक शिक्षणासाठी प्रयोगशाळा आणि एक प्रशिक्षक नियुक्त करण्यात आले आहे आजच्या डिजिटल युगात टिकण्यासाठी संगणकासोबत मैत्री साधने आणि त्याचे शिक्षण घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे हाच उद्देश ठेवून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली आयसीटी उपक्रम राबविण्यात येत आहे.



या उपक्रमांतर्गत ए.टी. झांबरे माध्यमिक विद्यालयात संगणक प्रयोगशाळा तयार केलेली असून या प्रयोगशाळेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी चे प्रशिक्षण दिले जाते. नुकताच इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या पाठ्यपुस्तकातील विविध घटकांवर आधारित पी.पी.टी. प्रेझेंटेशन आय.सी.टी. प्रयोगशाळेत सादर केले.

यासाठी आय.सी.टी.च्या प्रशिक्षक स्मिता शेंडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अनन्या मोरे, कार्तिकी पाटील, नूतन बारी मनस्वी महाजन ,तेजल (पान २ वर)

## वृद्धाचा रेल्वेतून पडल्याने मृत्यू

यावल : प्रतिनिधी

तालुक्यातील साकळी येथील प्रकाश गणेशमल जैन (वय ६५) हे कुटुंबासह केरळ राज्यात फिरायला जात असताना रेल्वेतून पडून त्यांचा मृत्यू झाला. ही घटना २३ मार्च रोजी मध्यरात्री घडली.

सविस्तर वृत्त असे कि, जैन व मित्राचे कुटुंब केरळ राज्यात फिरायला गेले होते. २१ मार्चला रात्री भुसावळ येथून मंगला एक्स्प्रेसने प्रवास करीत होते. प्रवासादरम्यान २३ मार्चला मध्यरात्री एक ते दीड वाजता प्रकाश जैन यांनी नातू पार्श याच्याशी गप्पागोष्टी करून मोबाईल त्याच्या जवळ दिला व लघुशंकेच्या निमित्ताने ते रेल्वे बोगीतील शौचालयाकडे गेले असता पुढील येणारे स्टेशन किती दूर आहे ? हे पाहण्यासाठी दाराजवळ गेले असता अचानकपणे तोल जाऊन ते रेल्वेतून खाली पडले. हे पाहून इतर प्रवाशांनी आरडाओरड केली. लागलीच त्यांचा मुलगा स्वप्रिल जैन याने चेन ओढून रेल्वे थांबविली. जवळपास दोन किलोमीटर मागच्या (पान २ वर)

## केस घेवून नये म्हणत वकिलावर चाकू हल्ला

भुसावळ : प्रतिनिधी

कौटुंबिक खटल्याची केस घेवू नये, या वादातून भुसावळातील वकिलावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना श्री नगर भागात मंगळवारी दुपारी घडल्याने शहरात खळबळ उडाली होती. या प्रकरणी रावेर तालुक्यातील रोझोदा येथील संशयिताला शहर पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील श्री नगर भागातील प्रवीण भागवत कोळी (वय ३५) हे व्यवसायाने वकिल आहेत. मंगळवारी दुपारी त्यांच्याकडे रावेर तालुक्यातील संशयित विकास (पान २ वर)

## हजारो विद्यार्थी घेणार सीईटी सराव परीक्षेत सहभाग

जळगाव : प्रतिनिधी

सलग ५ व्या वर्षी महाराष्ट्र राज्यातील सर्व 288 विधानसभेत शिवसेना नेते तथा युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात व शिवसेना तथा युवासेना सचिव आमदार वरूण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली अकरावी, बारावी व पदवीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत सीईटी सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. युवासेना आयोजित महासराव परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातील २२३१५ विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली असून जळगाव जिल्ह्यातून सर्वाधिक २६२८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

या अनुषंगाने जळगाव शहरासह जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी युवासेना - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे शनिवार दि. 29 मार्च रोजी सकाळी 10 ते दुपारी 1.00 वाजेदरम्यान अकरावी, बारावी व पदवीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत सीईटी सराव परीक्षा घेण्यात येणार आहे. यामध्ये जळगाव जिल्ह्यातील २६२८ विद्यार्थी सीईटी सराव परीक्षेत सहभागी होणार आहेत. यासाठी त्यांनी ऑनलाईन नाव नोंदणी सुद्धा केली आहे. या सीईटी सराव परीक्षेत अभियांत्रिकेत १११२२, निट मेडिकल साठी ६४९, फार्मसी साठी ४२५ व लॉ साठी ४३२ असे एकूण २६२८ विद्यार्थी परीक्षेत सहभागी होणार आहेत.

यामध्ये अभियांत्रिकी, (पान २ वर)

## धावत्या रेल्वेत १९ वर्षीय तरुणीचा टीसीनेच केला विनयभंग !

भुसावळ : प्रतिनिधी

गोरखपूर-बंगळुरू एक्स्प्रेसने प्रवास करणाऱ्या १९ वर्षीय तरुणीचा तिकिट निरीक्षकानेच विनयभंग केल्याचा प्रकार २२ मार्च रोजी घडला. पोलिसांनी संशयित रेल्वे तिकिट निरीक्षक प्रदीपकुमार तिवारी यास ताब्यात घेतल्यानंतर नोटीस बजावत त्याची सुटका केली. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशातील १९ वर्षीय तरुणी २२ रोजी गोरखपूर-बंगळुरू विशेष ट्रेनने पुण्याकडे निघाली होती. तिचे सेकंड एसीचे तिकिट आरएसी असल्याने तिने तिकीट निरीक्षकाची भेट घेत त्यांना बर्थ देण्याची मागणी केली. (पान २ वर)

# लेवा पाटीदार प्रीमिअर लीगचा उपक्रम; तीन दिवस रंगणार सामने

### कवयित्री बहिणाबाई महिला व सरदार वल्लभभाई पटेल बॉक्स क्रिकेट लीगचे २८ मार्चला उदघाटन

जळगाव : प्रतिनिधी

लेवा पाटीदार प्रीमिअर लीग आयोजित कवयित्री बहिणाबाई महिला बॉक्स क्रिकेट लीग, भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल पुरुष बॉक्स क्रिकेट लीग चे २८ ते ३० मार्च २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार दिनांक २८ मार्च रोजी सायंकाळी ७.३० वाजता क्रिकेट लीगचे थाटात उदघाटन केले जाईल. शिरसोली रोडवरील रॉयल टर्फ येथे सामने भरविण्यात येणार असून केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे ह्या ब्रँड अँबेसायडर आहे. या स्पर्धेत पुरुष व महिला या दोन्ही गटासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ आणि उत्तेजनार्थ अशे स्मृती चिन्ह दिले जाणार आहे.

पहिल्यांदाच महिलांसाठी या प्रकारची बॉक्स क्रिकेट लीग आयोजित करण्यात आली आहे. सहभागी बहुतांशी महिलांनी या आधी कधीच क्रिकेट व अन्य खेळ खेळले नाही. मात्र दिलेल्या आयोजकांनी प्रोत्साहनामुळे आणि समाजातील भगिनींच्या भक्कम साथीमुळे महिलांचा आत्मविश्वास वाढला आहे, हे या स्पर्धेचे वैशिष्ट्ये आहे.



या स्पर्धेच्या उदघाटनाप्रसंगी माजी महसूल मंत्री एकनाथराव खडसे, माजी खासदार डॉ उल्हास पाटील, आमदार अमोल जावळे, माजी आमदार शिरीषदादा चौधरी आदी प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित राहणार आहे.

या स्पर्धेसाठी गोदावरी फाऊंडेशन संचालित महादेव हॉस्पिटलच्या संचालिका डॉ केतकी ताई पाटील, आमदार राजूमामा भोळे, माजी महापौर ललित कोल्हे, एस व्ही पी एल सोलर चे संचालक हिमांशू इंगळे, डॉ पंकज पाटील, डॉ मनीष चौधरी, डॉ जितेंद्र ढाके, महेश चौधरी, दीपक पाटील, चेतन पाटील, दीप्ती ढाके, जयेश नारखेडे, डॉ वैभव पाटील, सोहम खडके, भूषण चौधरी, गौतम चौधरी, डॉ गौरव महाजन, निलेश चौधरी, हरीश कोल्हे, आशुतोष पाटील, तेजस रडे, योगेश खडके, जयेश भंगाळे, माधुरी अत्तरदे, सूचिता चौधरी, प्रीती महाजन, राधा कोल्हे, गायत्री राणे, पल्लवी चौधरी, पूजा महाजन, शर्वरी काळे, गायत्री महाजन, पूजा सरोदे, अमित भंगाळे आदींचे सहकार्य लाभले आहे.